# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्रमांक :- १४३-२२** **दिनांक :- २०/०५/२०२२**

## घरफोडी करुन चोरी करणा-या आरोपीतांना अटक करुन एकुण ४,०७,२३९/- रु. किंमतीचा मुद्देमाल हस्तगत-नवघर पोलीसांची कामगिरी.

दिनांक ०६/१२/२०२१ रोजी फिर्यादी सौ. ईशा दवे, वय ३७ वर्षे यांनी नवघर पोलीस ठाण्यात येऊन तक्रार दिली की, त्या इंद्रलोक भाईंदर पुर्व येथे रुम पाहण्यासाठी राहते घरास लॉक करुन गेल्या होत्या. त्यानंतर फिर्यादी या दुपारी १४.०० वा. परत घरी आल्या असता त्यांना त्यांचे घराचा दरवाजा उघडा दिसुन आला. फिर्यादी यांनी त्यांच्या घराची पाहणी केली असता त्यांना त्यांच्या घरातील व कपाटातील सामान अस्ताव्यस्त पडलेले दिसुन आले. तसेच कपाटात ठेवलेले २ सोन्याचे नेकलेस, ४ सोन्याच्या बांगडया, १ सोन्याचे मंगळसुत्र, १ सोन्याची चैन, चांदीचे पैजन, कडे व कमरबंद असे एकुण ५,५०,०००/- रु. किंमतीचे सोने व चांदीचे दागिन्यांची चोरी झालेले दिसुन आले. सदरबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन नवघर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. I ८३६/२०२१ भा.दं.वि.सं.कलम ३८०, ४५४ प्रमाणे अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला होता.

नवघर पोलीस स्टेशनच्या गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे व गुन्हयाचे गांभिर्य लक्षात घेऊन गुन्हयाचा तपास सुरु केला. घटनास्थळावरील प्राप्त पुरावे व तांत्रिक माहितीच्या आधारे गुन्हयाचा तपास केला असता गुन्हयातील आरोपीत हे राजस्थान, हैद्राबाद व कर्नाटक राज्यामध्ये असल्याचे कळून येत होते. संशयीताबाबत अधिक माहिती प्राप्त करुन आरोपी नामे भरतकुमार मोतीराम कुमावत, वय ३३ वर्ष, रा. जि. पाली व चेलाराम मोडाराम देवासी, वय २४ वर्षे, रा. जि. पाली, राज्य-राज्यस्थान यांना दिनांक ६/५/५०२२ रोजी अटक करण्यात आली. अटक आरोपीताकडे अधिक तपास करता त्याने सदरचा गुन्हा गुन्हयातील पाहिजे आरोपी हकमाराम चौधरी, रा. जालोर, राज्यस्थान याचेसह गुन्हा केला असल्याची कबुली दिली. तसेच सदर गुन्हयात आरोपी नामे चंदनसिंग भवरसिंग राजपुत, वय ३६ वर्षे, मुळ रा. जि. राजसमंद, राज्य-राजस्थान याचा सहभाग निष्पन्न झाल्याने त्यासदेखील दिनांक ११/५/२०२२ रोजी अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचे तपासात आरोपीतांकडुन ४,०७,२३९/- रु. किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. गुन्हयातील अटक आरोपी नामे भरतकुमार चौधरी याचेविरुध्द महाराष्ट्र व हैद्राबाद अशा राज्यातील वेगवेगळे पोलीस ठाणे अंतर्गत घरफोडी चोरीचे एकुण २२ गुन्हे दाखल असुन काहि न्यायालयाने त्याचेविरुध्द अजामीनपात्र वॉरंट जारी केल्याबाबतची माहिती मिळुन आलेली आहे.

सदरची कामगिरी श्री. अमीत काळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०१, डॉ. शशीकांत भोसले, सहा. पो.आयुक्त, नवघर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. मिलिंद देसाई, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नवघर पोलीस ठाणे, पोनि/प्रकाश मासाळ (गुन्हे), सपोनि/योगेश काळे, पोउनि/अभिजीत लांडे, पोहवा/भुषण पाटील, पोना/गणेश जावळे, पोशि/संदिप जाधव, सुरज घुनावत, ओमकार यादव, विनोद जाधव यांनी केलेली आहे.

------------ooooooo----------------